**<u>शैक्षणिक वर्ष २०२४-२५</u>:**
**अस्तित्वात असलेल्या महाविद्यालयांमध्ये नवीन अभ्यासक्रम / विषय/ विशेषस्तर विषय, अतिरिक्त तुकडी, नवीन विद्याशाखांना मान्यता देणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**उच्च व तंत्र शिक्षण विभाग**
**शासन निर्णय क्रमांक: HTED-२९०६६(१३)/१/२०२४/७७३४९४-MHT-(HE-४)**
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२
दिनांक: १५ जुलै, २०२४.

<u>संदर्भ</u> : १) उच्च व तंत्रशिक्षण विभाग, शासन निर्णय क्र. एनजीसी-२०१७/(२०८/१७)/मशि-४, दि. १३.०९.२०१७.

२) दिनांक ५.०७.२०२४ रोजी अधिसूचित करण्यात आलेला महाराष्ट्र अधिनियम क्र. XXIV/२०२४, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ (सुधारणा)अधिनियम, २०२४.

**शासन निर्णय**

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम १०९ (४) (घ) आणि संदर्भाधीन दि.१३.०९.२०१७ च्या शासन निर्णयान्वये विहीत केलेल्या कार्यपद्धतीनुसार राज्यातील सार्वजनिक विद्यापीठांनी शैक्षणिक वर्ष २०२४-२५ साठी नवीन अभ्यासक्रम/ विषय/ विशेषस्तर विषय, अतिरिक्त तुकडी, नवीन विद्याशाखांचे प्रस्ताव मान्यतेसाठी शासनाकडे सादर केले आहेत. सदर प्रस्तावांची संदर्भाधीन शासन निर्णयान्वये विहीत केलेल्या निकषांनुसार छाननी करण्यात आली. विद्यापीठांच्या शिफारशींच्या अनुषंगाने शासन स्तरावर केलेली छाननीनुसार पात्र ठरलेल्या प्रस्तावांना महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम १०९ (४) (घ) व त्याखालील परंतुकान्वये शासनास प्राप्त अधिकारानुसार अस्तित्वात असलेल्या महाविद्यालयात सोबतच्या विवरणपत्र - 'अ' मध्ये नमूद केलेल्या एकूण २६५ नवीन अभ्यासक्रम/ विशेषस्तर विषय/विषय, विवरणपत्र-ब मध्ये नमूद केलेल्या एकूण ७२ अतिरिक्त तुकडी व विवरणपत्र - 'क' मध्ये नमूद केलेल्या एकूण ५६ विद्याशाखा यांना खालील अटी व शर्तीच्या अधीन राहून **कायम विना अनुदान तत्वावर** मंजूरी देण्यात येत आहे.

**अटी व शर्ती :**

१. ज्या अनुदानित महाविद्यालयांना नवीन अभ्यासक्रम/ विषय/ विशेषस्तर विषय अतिरिक्त तुकडी, नवीन विद्याशाखा मंजूर करण्यात आलेल्या आहेत, त्या **कायम विनाअनुदान तत्वावरील** असल्याने सदर मान्यतेच्या अनुषंगाने अशा महाविद्यालयांना अनुदान तत्त्वावर शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांची मागणी करता येणार नाही.

२. ज्या महाविद्यालयांना नवीन अभ्यासक्रम/ विषय/ विशेषस्तर विषय, अतिरिक्त तुकडी, नवीन विद्याशाखा मंजूर करण्यात आलेल्या आहेत, त्या महाविद्यालयांनी त्यांच्या विभागीय सहसंचालकांकडे ते भविष्यात कोणत्याही परिस्थितीत अनुदानाची मागणी करणार नाहीत, असे हमीपत्र रु. १००/- च्या नॉन ज्युडीशियल स्टँप पेपरवर सादर करावे.

३. मान्यता मिळालेल्या तुकडी, विद्याशाखा व अभ्यासक्रमांच्या अनुषंगाने महाविद्यालयांनी संबंधित विद्यापीठाने विहित केलेल्या निकषांनुसार व विद्यापीठ अनुदान आयोगाने विहित केलेल्या शैक्षणिक पात्रतेनुसार अध्यापक/ कर्मचारी वर्ग नेमणे आवश्यक असून, इतर सर्व आवश्यक पायाभूत सोयी

उपलब्ध करावयात व त्याची खात्री विभागीय सहसंचालकांनी करावी आणि तद्नंतरच उपरोक्त अट क्र. २ मधील प्रमाणपत्र प्रमाणित करून विद्यापीठास द्यावे.

४. महाविद्यालयाने/संस्थेने हमीपत्र सादर केल्याशिवाय किंवा तसे विभागीय सहसंचालकांचे प्रमाणपत्र प्राप्त झाल्याशिवाय तसेच विद्यापीठ अनुदान आयोगाच्या (ॲफिलिएशन ऑफ कॉलेजस बाय युनिव्हर्सिटीज रेग्युलेशन २००९ मध्ये महाविद्यालयांना संलग्नीकरण देण्याबाबत विहित निकषांची पूर्तता केल्याशिवाय, संबंधित महाविद्यालयांना संलग्नीकरण देण्याची कार्यवाही विद्यापीठाने करू नये.

५. महाविद्यालयाने कोणत्याही परिस्थितीत मंजूर प्रवेश क्षमतेपेक्षा जास्त प्रवेश देऊ नयेत.

६. महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम १०९ (४) (घ) खालील पंरतुकानुसार प्राप्त अधिकारात नवीन महाविद्यालयांच्या प्रस्तावातील नॅक व अन्य त्रुटींच्या पूर्ततेची खातरजमा करण्याची जबाबदारी संबंधित विद्यापीठाची राहील. त्याचप्रमाणे सदर त्रुटी पुर्तता ६ महिन्यांच्या आत न झाल्यास सदर मान्यता आपोआप रद्द होईल. याबाबत आवश्यक कार्यवाही करण्याची दक्षता संबंधित विद्यापीठांनी घ्यावी. सदर कारणास्तव मान्यता रद्द झाल्यास विद्यार्थ्यांच्या समायोजनाची कार्यवाही संबंधित सहसंचालक, उच्च शिक्षण यांनी करावी.

७. विद्यापीठांनी सदर शासन निर्णयाचे अवलोकन केल्याशिवाय संलग्नता देण्याची प्रक्रिया सुरु करु नये. विद्यापीठांनी संलग्नतेबाबतचा पूर्तता अहवाल संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे व संबंधित विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण यांना पाठवावा.

८. संबंधित विद्यापीठांनी व विभागीय सहसंचालकांनी मंजूर करण्यात आलेल्या नवीन अभ्यासक्रम / विषय/ विशेषस्तर विषय, अतिरिक्त तुकडी, नवीन विद्याशाखांच्या अनुषंगाने नियतकालिक आढावा घेऊन सदर नवीन अभ्यासक्रम / विषय/ विशेषस्तर विषय, अतिरिक्त तुकडी, नवीन विद्याशाखांमध्ये मंजुर विद्यार्थी संख्येच्या ५०% किंवा त्यापेक्षा कमी विद्यार्थी दिसून आल्यास सदर नवीन अभ्यासक्रम / विषय/ विशेषस्तर विषय, अतिरिक्त तुकडी, नवीन विद्याशाखांची मान्यता रद्द समजून तसे आदेश विभागीय सहसंचालकांनी आदेश काढावेत व ते शासन व संबंधित विद्यापीठाकडे पाठवावेत.

२. महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ मधील तरतूदीनुसार विस्तारीकरणांतर्गतनवीन अभ्यासक्रम / विषय/ विशेषस्तर विषय, अतिरिक्त तुकडी, नवीन विद्याशाखा यांना मान्यता देण्याबाबतची अंतिम मुदत १५ जून अशी आहे. परंतु शासन अधिसूचना दि. ०५.०७.२०२४ अन्वये सदर मुदत १५ जुलै पर्यंत वाढविण्यात आली आहे.

३. सदर शासन आदेश महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२४०७१५११२४३०८५०८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

**(अशोक मांडे)**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१. मा. राज्यपाल यांचे प्रधान सचिव, राजभवन, मुंबई.

२. मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.

३. मा. उपमुख्यमंत्री यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई.
४. मा. मंत्री, उच्च व तंत्र शिक्षण,  यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
५. प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग-,  मंत्रालय, मुंबई.
६. संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे.
७. कुलसचिव, सर्व सार्वजनिक विद्यापीठे, महाराष्ट्र राज्य.
८. सर्व संबंधित विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य.
९. संबंधित संस्था (विद्यापीठामार्फत).
१०.निवडनस्ती (मशि-४).

| | | | |
|---|---|---|---|
| | | जामनेर रोड आणि ए.एच.-४६ जवळ, ता.भुसावळ जि. जळगाव | विज्ञान व तंत्रज्ञान - एम.एस.सी. (भौतिकी रसायनशास्त्र) (विशेष/मुख्य ) [ प्रथम वर्ष ] |
| २४२. | ८. | श्रम साधना बॉम्बे ट्रस्ट संचालित कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, बांभोरी<br>पो.बॉ.क्र. ९४, बांभोरी, जळगाव ता.धरणगाव जि. जळगाव | विज्ञान व तंत्रज्ञान - बी.एस.सी [ डेटा सायन्स (दुय्यम/सर्व साधारण )[प्रथम वर्ष]] |
| २४३. | ९. | एसएस अॅन्ड एसएस एस विद्याधन कॉमर्स कॉलेज, वलवाडी, धुळे<br>विद्याधन महाविद्यालय, वलवाडी (धुळे) वाडीभोकर, एम.एस.इ.बी. जवळ, वडेल रोड, वलवाडी, धुळे ता.धुळे जि. धुळे | विज्ञान व तंत्रज्ञान - एम.एस.सी. (वनस्पति शास्त्र) (विशेष/मुख़्य ) [ प्रथम वर्ष ]<br>विज्ञान व तंत्रज्ञान - एम.एस.सी. (संगणक विज्ञान) (विशेष/मुख्य ) [ प्रथम वर्ष ]<br>विज्ञान व तंत्रज्ञान - एम.एस.सी. (अकार्बनिक रसायन शास्त्र) (विशेष/मुख़्य ) [ प्रथम वर्ष ]<br>विज्ञान व तंत्रज्ञान - एम.एस.सी. (कार्बनिक रसायन शास्त्र) (विशेष/ मुख्य ) [ प्रथम वर्ष ] |
| २४४. | १०. | विठ्ठल पार्क महिला बहुउद्देशिय संस्थेचे सौ. प्रतिभाताई शरदचंद्र पवार महाविद्यालय<br>Shantiban Appartment, Gajanan Colony, Navsacha Ganpati Road, , Jalgaon City Survey No.८४०१. Shop No.९, १०, ११,१२,१३ ता.जळगाव जि. जळगाव | विज्ञान व तंत्रज्ञान - बी.एस.सी [सूक्ष्मजैविकी (दुय्यम/सर्व साधारण )[प्रथम वर्ष],<br>संख्याशास्त्र (दुय्यम/सर्व साधारण )[प्रथम वर्ष],<br>प्राणी शास्त्र (दुय्यम/सर्व साधारण )[प्रथम वर्ष],<br>रसायन शास्त्र (दुय्यम/सर्व साधारण )[प्रथम वर्ष],<br>मराठी (दुय्यम/सर्व साधारण )[प्रथम वर्ष],<br>भूगोल (दुय्यम/सर्व साधारण )[प्रथम वर्ष],<br>हिंदी (दुय्यम/सर्व साधारण )[प्रथम वर्ष],<br>जीवशास्त्र (दुय्यम/सर्व साधारण )[प्रथम वर्ष]] |
| **स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड** | | | |